**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –5, June.2013**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्राच्या कृषी विकासातील सहकार क्षेत्राचे योगदान

प्रा.श्री.बी.बी.शितोळे
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा.

**प्रस्तावना** -

महाराष्ट्र हे आर्थिक विकासातील आघाडीवरचे राज्य म्हणून ओळखले जाते. औद्यौगिक क्षेत्राबरोबरच शेती क्षेत्रांचाही विकास गतीने होत असून एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या जवळपास 57 : मनुष्यबळ कृषी क्षेत्रात कार्यरत आहे. आज महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशात सहकार क्षेत्राच्या विकासामध्ये एक वेगळा ठसा उमटविला आहे. कृषी पतसंस्था, सागर कारखाने , सूत गिरण्या, तेल गिरण्या , खत कारखाने, दुग्ध व्यवसाय इ. कृषी प्रक्रिया व कृषी क्षेत्रासंबंधी अनेक उद्योग सहकार चळवळीच्या माध्यमातून उभे आहेत. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रास आवश्यक पतपुरवठा, पाणी वितरण,वाहतूक संस्था, पणन संस्था, साठवणूक संस्था या माध्यमांद्वारे महाराष्ट्राच्या शेती विकासाला सहकार चळवळी बहुमोल असे योगदान दिले.प्रारंभापासूनच सहकार चळवळ कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये सर्वव्यापी भूमिका करत असून गेल्या पन्नास वर्षामध्ये महाराष्ट्राच्या शेती विकासात सहकार चळवळीने कलेल्या योगदानाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोधनिबंधाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. महाराष्ट्राच्या कृषि विकासातील सहकारी संस्थाच्या योगदानाचा अभ्यास करणे.
२. कृषि क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध सहकारी संस्थांच्याकामगिरीचे विश्लेषण करणे.
३. कृषि क्षेत्राच्या विकासात कार्यरत सहकारी संस्थेच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ व्हावी या दृष्टीने परिणामकारक उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध मुख्यत्वे दुय्यम स्वरूपाच्या माहितीवर आधारित असून सहकार विषयक विविध ग्रंथ, विविध सहकारी संस्थांचे अहवाल, महाराष्ट्र राज्य सहकारी खात्याचे अहवाल, विविध शोधनिबंध, नियतकालीके आणि सहकार क्षेत्रातील नेत्यांचे योगदान इ. प्रमुख स्त्रोतांचा अवलंब केला असून निरीक्षण आणि अभ्यासाच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील कृषीविषयक सहकारी संस्थाचे योगदान** -

देशामध्ये इ.स.1904 मध्ये पहिला सहकारी कायदा संमत झाला असला तरी पहिली पंन्नास वर्ष(1954 पर्यंत) सहकार क्षेत्राचा फार विकास झाल्याचे दिसत नाही. 1954 मध्ये नियुक्त केलेली ग्रामीण सर्वेक्षण समिती व इ.स.1960 चा वैकुंठलाल मेहता समितीचा अहवाल आणि पंचवार्षिक योजनांमध्ये सहकाराचा सतत पुरस्कार यांची फलश्रुती म्हणजेच आजची सहकार चळवळ जोमाने उभी असल्याचे दिसून येते. 1 मे 1960 महाराष्ट्राच्या स्थापनेपासून तर कै. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, विठ्ठलराव विखे पाटील, रत्नापा कुंभार, शंकरराव मोहिते पाटील या नेत्यांबरोबर डॉ.धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता या विचारवंताच्या योगदानामुळे संपूर्णमहाराष्ट्रात सहकार चळवळ फोफावली परिणामी शेती क्षेत्राच्या

विकासास गती मिळाली.1 मे 1960 पासून 31 मार्च 2009 पर्यंत शेती विषयक सहकारी संस्थाचे अक्षरश: जाळे यामुळे विणले गेले.संपूर्णमहाराष्ट्राचा ग्रामीण भागास आज आर्थिक सुबत्ता आलेली आहे. ती आकडेवार पुढील तक्यात दर्शविण्यात आलेली आहे.

**कृषी विषयक सहकारी संस्था मार्च 2009**

| अ.क्र. | संस्था प्रकार | संस्था |
|---|---|---|
| 1. | प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था | 21248 |
| 2. | सहकारी साखर कारखाने | 201 |
| 3. | सहकारी सूत गिरण्या | 122 |
| 4. | सहकारी दुग्धसंस्था | 30075 |
| 5. | सहकारी पणन संस्था | 1250 |

स्त्रोत - महाराष्ट्र आर्थिक पाहणी -2009

**प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था -**

महाराष्ट्राच्या शेती विकासामध्ये प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचीभूमिका महत्त्वपूर्ण असून राज्यात मार्च 2009 मध्ये 21248 कृषी सहकारी पतसंस्थांनी सुमारे रूपये 6000 कोटी इतका पतपूरवठा केला होता. मागील दशकामध्ये प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्याकर्जपुरवठयाचे प्रमाण 30 : पर्यत होते. त्यामुळे वैद्यनाथन समितीच्या अहवालावर मुख्यमंत्रयाच्यापरिषदेत चर्चा करताना मा. पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी चिंता व्यक्त करून सहकाराच्या पुनबांधणीवरसूतवाच केले होते. असे असले तरी महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीचे योगदान मोठे असून इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व कृषी सहकारी पतसंस्था यांचा कर्जपुरवठा मोठा आहे. ग्रामिण भागातील सावकारांचे उच्चाटन करून कृषी उत्पादकांना आर्थिक पाठबळ देण्यापेक्षा पतसंस्थांचीभूमिका मोठी आहे.

सकारी साखर कारखाने -

महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सहकारी साखर कारखानदारी कै.विठ्ठलराव विखे पाटील आणि अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रयत्नाने प्रथम सुरू झाली. हे पहिलेच पाऊल यशस्वी पडल्यामुळे आज अखेर सहकारी साखर कारखान्याची संख्या 201 इतकी झाली आहे. सहकारी कारखान्यामुळे सभासदांच्या सुशिक्षित मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच बी बियाणे, खते रास्त दरात व वेळेवर उपलब्ध होत आहेत. कारखान्याच्या हमीमुळे कर्ज वेळेवर उपलब्ध होत आहे. सद्या उसाला चांगली किंमत मिळत असल्यामुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. संपूर्णमहाराष्ट्रभर विशेषत: पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि मराठवाडा या ठिकाणी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमुळे या भागात अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम यशस्वी झाले आहेत. परिणामी ग्रामिण भागाच्यर सर्वांगीण विाकरस मदत झाली आहे.

सहकारी सूत गिरण्या -

पश्चिम महाराष्ट्र ज्याप्रमाणे उसाला पट्टा म्हणून ओळखला जातो तसा विदर्भ हा महाराष्ट्रातील पांढरे सोने (कापूस ) उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर असणारा भाग परिणामी त्यावर प्रक्रिया करण्याचा उद्योगाची उभारणी करण्यामध्येही सहकार क्षेत्राची महत्वपूर्ण भूमिका असून सरकी काढणे, कापसाच्या गाठी करणे, सूत तयार करणे इ. क्षेत्रातही सहकार क्षेत्राद्वारे अनेक प्रक्रिया उद्योग उभे आहेत. इ.स.2009 पर्यंत सहकारी सूत गिरण्यांची संख्या 122 इतकी होती . आज सहकारी तत्वावरील सूत गिरणी व्यवसाय विविध समस्यांना तोंड देत असला तरी काही सूत गिरण्या कार्यक्षमतेच्या जोरावर चांगल्या प्रकारचा नफा मिळवून शेतकरी सभासदांना आर्थिक स्थैर्य देण्यात महत्वाची भूमिका करत आहेत.

**महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध व्यवसाय** -

दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसायास महाराष्ट्रात अनन्यसाधारण महत्व असून आज ग्रामिण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून याकडे पाहिले जोत. महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीमुळे दुग्धव्यवसायास गती मिळाली असून दुध संकलन करून त्यावर प्रक्रिया करून स्थानिक बाजारपेठ बरोबरच आंध्रप्रदेश,कर्नाटक,गोवा,मध्यप्रदेश,इ. राज्यामध्येही महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसायाने बाजारपेठ निर्माण केली आहे.

31 मार्च 2009 अखेर महाराष्ट्रामध्ये सहकारी दुग्णधसंस्थाची संख्या 30775 इतकी आहे. दुग्धशाळा,शीतकरण केंद्रे,प्रक्रिया संस्था,दुध पावडर कारखाने इ.दुग्ध व्यवसाय क्षेत्रातही सहकार क्षेत्राने भरीव प्रगती केली आहे. दुग्ध व्यवसाय महाराष्ट्रामध्ये एक जोडधंदा म्हणून यशस्वी झालाच शिवाय जवळपास 15 लाख शेतक-यांना याद्वारे रोजगार उपलब्ध झाला. यापैकी 70 : शेतकरी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांपैकी आहेत. सहकारी दुग्ध संस्था, शेतकर-यांना दुभत्या जनावरांचे वाटप, संवर्धन मार्गदर्शन, जनावरांना आरोग्य सुविधा, खाद्य वितरण इ. महत्वपूर्ण भूमिका करत आहोत.

**सहकारी पणन संस्था -**

शेती उत्पादकास आपल्या मालाचे विपणन योग्य प्रकारे करता यावे.त्यांना मालाच्या योग्य किंमती मिळाव्यात यासाठी सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. सहकारी पणन संस्थामुळे कृषी उत्पादकास वस्तूंचे वनज, साठवणूक, प्रतवारी,मार्गदर्शन इ. सुविधा उपलब्ध होत आहेत. इ.स. 2007 अखेर शेती मालाची खरेदी -विक्री करण्यासठी कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत 300 मुख्य बाजार व 600 उपबाजार कार्यरत होते. या बाजारांमध्ये त्यावर्षी आवक झालेल्या शेती मालाचे मुल्य रू.17600 कोटी इतके होते. आज अनेक मुख्य बाजारांचे संगणकीकरण करण्यात आले असून स्वतंत्र वेबसाईटद्वारे अद्ययावत माहिती कृषी उत्पादकांना उपलब्ध झाली आहे. याशिवाय स्थानिक पातळीवरही फलोत्पादन, पालेभाज्या, फुलोत्पादन इ.च्या विपणनासाठी अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत. काही सहकारी पणनसंस्था कृषी उत्पादकांना उत्पादनाच्या निर्याती बाबतही मार्गदर्शन करतात तर काही प्रत्यक्षपणे निर्यात करतात.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची कृषी विकासातील भूमिका **-**

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ ही राज्यातील शेतकर-यांचे हितसंवर्धन करण्या-या कृषी पणन संस्थांची शिखर संस्था असून आज राज्यातील 782 पणनसंस्था या महासंघाच्या सदस्य आहेत.कृषी विकासाच्या दृष्टीने पणन **महासंघाची प्रमुख**

**उद्दिष्टये -**

अ) आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत कृषी उत्पादाची खरेदी करणे

ब) रासायनिक खतांचे वितरण करणे

क) मिश्रखत व पशुखाद्यांचे उत्पादन व वितरण करणे

ड) कृषी उत्पादनास साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाने गेल्या 50 वर्षात कृषी क्षेत्राच्या विकासात गगन भरारी घेतली असून इ.स.1961 साली महासंघाची उलाढाल केवळ रू.6.2 कोटी इतकी होती 31 मार्च 2010 अखेर ती रू.487.42 कोटी पर्यंत पोहचली आहे.

**महाराष्ट्र राज्य पणन महासंघाची उलाढाल**

| वर्ष | उलाढाल (रू.कोटी ) |
|---|---|
| 1961 | 6.2 |
| 1970 | 46.9 |
| 1980 | 84.91 |
| 1990 | 181.54 |
| 2000 | 467.13 |
| 2010 | 487.42 |

स्त्रोत - महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ प्रकाशन – 2010

महासंघाने सहकाराच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासात महत्वूर्ण योगदान केले आहे. कृषी विपणनातील एक महत्त्वाची सुविधा म्हणजे कृषी उत्पादनाची साठवणूक होय. या क्षेत्रात महासंघाने इ.स.1980 मध्ये पदार्पन केले प्रारंभी केवळ .7 लक्ष मेट्रीक टन क्षमतेवरून साठवणूक क्षमतेत 31/3/2010 पर्यंत लक्षणीय वाढ केली. महासंघाच्या गोदामांची साठवणूक क्षमता आज 2 लक्ष 53 हजार मेट्रीक टन इतकी आहे.

2007 पासून डी.ए.पी. व तत्सम खतांची टंचाई निर्माण होत आहे. यावर मात करण्यासाठी महासंघाने यशस्वी भूमिका केली असून 2009 -2010 या वर्षांत 2,50,000 मे.टन खत शासनाच्या वतीने आयात करून योग्य पध्दतीने वितरण केले आहे. सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील शेतकरी आत्माहत्या करत आहे या समस्येच्या मुळावर घाव घालता यावा या उद्देशाने पणन महासंघ कांही महत्त्वपूर्ण योजना हाती घेत आहे.यामध्ये प्रामुख्याने नवीन खत निर्मिती उद्योग , पशुखाद्य निर्मिती, कृषी उत्पादन प्रक्रिया उद्योग, कृषी मॉल उभारणी,वेअर हाऊस रिसिट व्यवसाय इ.योजनांचा समावेश आहे.

**कृषीसिंचन क्षेत्र-**

कृषी सिंचन क्षेत्रातही सहकार चळवळीचे योगदान लक्षात घेण्यासारखे आहे.कृषी क्षेत्रास सिंचन सुविधा निर्माण करणे तसेच उपलब्ध सिंचन मार्गाचा योग्य वापर व्हावा उद्देशाने महाराष्ट्राच्या ग्रामिण भागात विशेषत: पश्चिम महाराष्ट्द आणि मराठवाडयात कृषी सिंचन सहकारी संस्था कार्यरत आहेत. छोटे छोटे सिंचन मार्ग निर्माण करणे यामध्ये प्रामुख्याने लिप्ट इरिगेशन प्रकल्प सहकारी संस्थाद्वारे हाती घेण्यात आले आहेत. परिणामी अल्प भू-धारक शेतक-यास बागायती करणे शक्य झाले आहे. तसेच सिंचन विभागाच्याच्या लघु,मध्यम व मोठया प्रकल्पाद्वारे उपलब्ध पाण्याचा वापर योग्य व नियोजनपूर्वक व्हावा या हेतूने या सहकारी संस्था महत्त्वपूर्ण भूमिका करत आहेत.

याशिवाय आज संपूर्ण महाराष्ट्राच्या पिकपध्दतीमध्ये बदल होतो आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाऐवजी फलोत्पादन,पालेभाज्या,फुलोत्पादन,औषधीवनस्पती इ.पिकाखालील क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे याच्या विपणनास व प्रक्रिया करण्यास सहाय्यभूत ठरणा-या अनेक सहकारी संस्था महाराष्ट्रभर निर्माण होत आहेत. म्हणजेच गेल्या 50 वर्षामध्ये कृषी क्षेत्राच्या विकासात सहकार चळवळीने मोलाचे योगदान दिले आहे.

**निष्कर्ष -**

महाराष्ट्राच्या कृषी विकासात पतपुरवठा,विपणन,प्रक्रिया उद्योग कृषीपूरक क्षेत्रातही सहकाराचे मोठे योगदान आहे तरीसुध्दा आपण यामध्ये पूर्णपणे यशस्वी झाली आहे असे म्हणता येते नाही. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र देशातील इतर राज्यांपेक्षा व्यापक आहे. परंतू निकोपणाचा अभाव पहावयास मिळतो. मोठया प्रमाणात राजकारण, अकार्यक्षम व्यवस्थापन, भ्रष्टाचार , नावापूरती लोकशाही, दुर्बल शेतक-यांकडे दुर्लक्ष,अकार्यक्षम वित्तिय नियोजन ,इ.अनेक उणिवा पहावयास मिळतात.या उणिवा केवळ कायद्यात दुरूस्त्या करून कमी होणार नाहीत. जेव्हा लोकांच्या वैचारिकते मध्ये अमुलाग्र बदल होईल,सहकारी संस्था ही आपली स्वत:ची संस्था आहे अशी भावना लोकांच्यामध्ये निर्माण होईल,ख-या अर्थाने लोकसहभाग वाढेल तेव्हा सहकार चळवळ निश्चितपणे फलश्रुती देणारी ठरेल.

**महत्वपूर्ण शिफारशी :**

प्रस्तुत अभ्यासामध्ये विविध अहवाल, संदर्भ ग्रंथ आणि शोधनिबंध इ. चा सखोल अभ्यास आणि सहकार क्षेत्रातील विविध संस्थांच्याकामकाजांचे निरीक्षण यावर आधारित संशोधकाद्वारे काही शिफारशी करण्यात येत आहेत.

१. संचालक मंडळास व्यवस्थापकीय प्रशिक्षण देण्याची व्यवस्था असावी. त्यामुळे सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

२. कर्मचारी वर्गास पायाभूत स्वरूपाचे आणि कार्यात्मक अशा दोन्ही प्रकारचे प्रशिक्षण दिले जावे परिणामी कर्मचारी वर्गात सहकाराविषयी आणि व्यवसाय संस्थेविषयी आपुलकीची भावना निर्माण होईल तसेच कर्मचाऱ्यांच्या क्षमतेत वाढ होईल.

३. सहकारी संस्थाचा उपयोग केवळ राजकीय स्वार्थासाठी होऊ नये अशा स्पष्ट तरतूदी सहकारी कायद्यामध्ये असाव्यात.

४. दुर्बल शेतकरी वर्गासाठी सर्वच सहकारी संस्थांनी विशेष योजनांची आखणी करून त्याची प्रभावी अंमल बजावणी करावी.

**संदर्भ सूची -**

1. Datta and Sundharam- Indian Economy – S.Chand, New Delhi,2008
2. Planning Commission of India- Maharashtra Development Report- Academic Foundation,2007
3. Kisan Shakti – Sugarcane Special ,2009
4. Sugar Dalry,2010
5. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2009
6. महाराष्ट्र राज्य सहकार पणन महासंघ प्रकाशन 2010- विकासाची सुवर्ण महोत्सवी गगन भरारी
7. लोकराज्य - एप्रिल 2010
8. मा. पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांचे वैद्यनाथन समिती अहवालावरील चर्चेसमयीचे भाषण 2005
9. सहकारी महाराष्ट्र - (विविध अंक)
10. Various Issues of the Maharashtra Co-operative quarterly